# करुणात्रिपदी

Karunatripadi — The Threefold Prayer of Compassion · P. P. Vasudevanand Saraswati (Tembe Swami)

## पहिले पद

> शांत हो श्रीगुरुदत्ता। मम चित्ता शमवी आता।।ध्रु।।

तू केवळ माता जनिता। सर्वथा तू हितकर्ता।।
तू आप्तस्वजन भ्राता। सर्वथा तूचि त्राता।।
भयकर्ता तू भयहर्ता। दंडधर्ता तू परिपाता।।
तुजवाचुनि न दुजी वार्ता। तू आर्ता आश्रय दत्ता।।
मम चित्ता शमवी आता । शांत हो ।।१।।

अपराधास्तव गुरुनाथा। जरि दंडा धरिसी यथार्था।।
तरि आम्ही गाउनि गाथा। तव चरणीं नमवू माथा।।
तू तथापि दंडिसी देवा। कोणाचा मग करूं धावा ?
सोडविता दुसरा तेव्हां। कोण दत्ता आम्हां त्राता ?
मम चित्ता शमवी आता । शांत हो ।।२।।

तू नटसा होउनि कोपी। दंडिताहि आम्ही पापी ।।
पुनरपिही चुकत तथापि। आम्हांवरी नच संतापी ।।
गच्छतः स्खलनं क्वापि। असें मानुनि नच होऊ कोपी ।।
निजकृपा लेशा ओपी। आम्हांवरि तू भगवंता।।
मम चित्ता शमवी आता । शांत हो ।।३।।

तव पदरीं असता ताता। आडमार्गी पाऊल पडतां ।।

सांभाळुनि मार्गावरता। आणिता न दूजा त्राता।।

निजबिरुदा आणुनि चित्ता। तू पतितपावन दत्ता।।

वळे आतां आम्हांवरता। करुणाघन तू गुरुनाथा।।

मम चित्ता शमवी आता । शांत हो ।।४ ।।

सहकुटुंब सहपरिवार। दास आम्ही हें घरदार ।।

तव पदी अर्पू असार। संसाराहित हा भार ।।

परिहरिसी करुणासिंधो। तू दीनानाथ सुबन्धो।।

आम्हां अघ लेश न बाधो। वासुदेव-प्रार्थित दत्ता।।

शांत हो श्रीगुरुदत्ता। मम चित्ता शमवी आता।।५ ।।

## दुसरे पद

> श्रीगुरुदत्ता जय भगवंता। ते मन निष्ठुर न करी आता।।ध्रु।।
>
> श्रीगुरुदत्ता ।।

चोरे द्विजासी मारीता मन जे। कळवळले ते कळवळो आता।।

श्रीगुरुदत्ता ।।

पोटशूळाने द्विज तडफडता। कळवळले ते कळवळो आता।।

श्रीगुरुदत्ता ।।

द्विजसुत मरता वळले ते मन हो की उदासीन न वळे आता।।

श्रीगुरुदत्ता ।।

सतिपति मरता काकुळती येता। वळले ते मन न वळे की आता।।

श्रीगुरुदत्ता ।।

श्रीगुरुदत्ता त्यजी निष्ठुरता। कोमल चित्ता वळवी आता।।

श्रीगुरुदत्ता जय भगवंता। ते मन निष्ठुर न करी आता।।ध्रु।।

श्रीगुरुदत्ता ।।

---

## तिसरे पद

> जय करुणाघन निजजनजीवन।
>
> अनसूयानन्दन पाहि जनार्दन।।ध्रु।।
>
> जय करुणाघन ।

निज-अपराधे उफराटी दृष्टी।

होऊनि पोटी भय धरू पावन।।१।।

जय करुणाघन ।

तू करुणाकर कधी आम्हांवर।

रुससी न किंकर-वरद-कृपाघन।।२।।

जय करुणाघन ।

वारी अपराध तू मायबाप।

तव मनी कोप लेश न वामन।।३।।

जय करुणाघन ।

बालकापराधा गणे जरी माता।

तरी कोण त्राता देईल जीवन।।४।।

जय करुणाघन ।

प्रार्थी वासुदेव पदी ठेवी भाव।

पदी देवो ठाव देव अत्रिनन्दन।।५ ।।

जय करुणाघन निजजनजीवन।

अनसूयानन्दन पाहि जनार्दन।।ध्रु ।।

जय करुणाघन ।

---

## सांगावे

> सांगावे, कवण्या ठाया जावे, कवणा ते स्मरावे,
>
> कैसे काय करावे, कवण्या परि मी रहावे |
>
> कवण येउन, कुरुंद-वाडी, स्वामी ते मिळवावे ||धृ||

या हारि, जेवावे व्यवहारी, बोलावे संसारी,

घालूनी अंगिकारी, प्रतीपाळीसि जो निर्धारी,

केला जो निज निश्चय स्वामी कोठे तो अवधारी ||१||

या रानी, माझी करुणावाणी, काया कष्टील प्राणी,

ऐकुनी घेशील कानी, देशील सौख्य निदानी,

संकट होउनि, मूर्च्छित असता, पाजील कवण पाणी ||२||

त्यावेळा, सत्पुरुषांचा मेळा, पहातसे निज डोळा,

लावति भस्म कपाळा, सांडी भय तू बाळा,

श्रीपाद श्रीवल्लभ म्हणती, अभय तुज गोपाळा ||३||